सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १२ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारताच्या सीमेवर अवकाशातूनही करडी नजर; इस्त्रो RIS-T-1B लॉन्च करणार

### भारताची सीमा आता आणखी सुरक्षित आणि मजबूत होणार : १८ मे रोजी इस्त्रो नवीन सॅटेलाईट लॉन्च

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२इंफाल**

भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धविराम झाल्यानंतरही भारताकडून सतर्कता बाळगण्यात येत आहे. भारतीय अंतराळ संस्था इस्त्रो ने देशाच्या सुरक्षेसाठी १० सॅटेलाईट सतत काम करत आहेत. हे सॅटेलाईट २४ तास अवकाशातून सीमेवर लक्ष ठेवणार आहेत असं विधान इस्त्रोचे चेअरमन वी. नारायण यांनी केले. एग्रीकल्चरल यूनिवर्सिटीच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. इंफालमध्ये हा कार्यक्रम झाला. पाकिस्तानशी सुरू असलेल्या तणावात देशाच्या सुरक्षेसाठी इस्त्रो वैज्ञानिक सातत्याने प्रयत्न करत आहेत. त्यासाठी भारत-पाकिस्तान सीमेवर आता नवीन सॅटेलाईट कायम करडी नजर ठेवून असणार आहेत.

इस्त्रो प्रमुख म्हणाले की, देशाच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी कमीत कमी १० सॅटेलाईट सातत्याने काम करत आहेत. तुम्ही सर्व आपल्या शेजाऱ्याबाबत जाणता, जर आपल्याला देशाच्या सुरक्षेची काळजी घ्यायची असेल तर सॅटेलाईटच्या माध्यमातून आपल्याला सेवा करावी लागणार आहे. आम्ही आपल्या ७००० किमी सागरी किनाऱ्यावर लक्ष ठेवून आहोत. उत्तरेकडेही सातत्याने लक्ष दिले जात आहे.



सॅटेलाईट आणि ड्रोन तंत्रज्ञानाशिवाय आपण हे करू शकत नाही. भारताची सीमा आता आणखी सुरक्षित आणि मजबूत होणार आहे. येत्या १८ मे रोजी इस्त्रो नवीन सॅटेलाईट लॉन्च करणार आहे. त्याचे नाव RIS-T-1B असं आहे. त्याला EOS-09 नावानेही ओळखलं जाणार आहे. श्रीहरिकोटा येथून स्पेस सेंटरहून ते लॉन्च होईल.

**RIS-T-1B सॅटेलाईटमध्ये काय आहे खास?**

RIS-T-1B ही एक खास रडार इमेजिंग सॅटेलाईट आहे जी प्रत्येक वातावरणात काम करू शकते. पाऊस असो धुक्याची चादर किंवा रात्र, या सॅटेलाईटमधून पृथ्वीवरचे फोटो घेता येऊ शकतात. त्यात उ-ब्रँड सिंथेटिक एपर्चर रडार लावण्यात आलीय. ही रडार खूप चांगल्या क्वालिटीचे फोटो घेते. नेहमी जे कॅमेरेवाले सॅटेलाईट असतात ते खराब हवामानात अथवा रात्री चांगले फोटो घेत नाहीत परंतु RIS-T-1B प्रत्येक परिस्थितीत काम करते. ही सॅटेलाईट भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने खूप महत्त्वाची असणार आहे. विशेषत: ऑपरेशन सिंदूरनंतर ती गरजेची आहे. त्यातून भारतीय सैन्याला पाकिस्तान, चीनच्या सीमेवर नजर ठेवण्यास मदत मिळणार आहे. देशाच्या सागरी सीमेची सुरक्षाही होईल. हे सॅटलाईट घुसखोरी रोखेल आणि दहशतवाद विरोधी अभियानात फायदेशीर ठरेल.

दरम्यान, RIS-T-1B दहशतवाद्यांना पकडण्यास मदत करेल. जर दहशतवादी सीमेतून घुसखोरी करत असतील तर त्यांच्या हालचाली सहजपणे टीपेल. या सॅटेलाईटमध्ये ५ वेगवेगळ्या इमेजिंग मोड आहेत. एक मोडमध्ये खूप लहान गोष्टीचाही फोटो घेता येऊ शकतो. दुसऱ्या मोडमध्ये मोठ्या परिसराचा फोटो घेता येईल. या सॅटेलाईटचा मिलिट्रीसोबतच सर्वसामान्यांसाठीही उपयोग होईल. ज्यात शेती, जंगल, माती परिक्षण, भूविज्ञान, पूर यावरही नजर ठेवता येईल.

## पाकिस्तानवरील कारवाई दरम्यान बंद केलेले ३२ विमानतळ आजपासून पुन्हा सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नवी दिल्ली**

पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू झाला होता. यादरम्यान, देशातील ३२ विमानतळ बंद करण्यात आली होती. दरम्यान, दोन दिवसापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविरामची घोषणा केली. यामुळे पाकिस्तान आणि भारताच्या सीमेवर सध्या शांतता आहे. कालपासून सीमेवर गोळीबार झालेला नाही.



युद्धविरामनंतर भारताने आपले हवाई क्षेत्र पूर्णपणे उघडले आहे,

कोणत्याही अडथळ्याशिवाय विमानसेवा सुरू होईल. फक्त भारतच नाही तर पाकिस्ताननेही आपले हवाई क्षेत्र उघडले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने २३ मे पर्यंत हवाई क्षेत्र बंद केले होते.

भारतीय हवाई दलाच्या सूचनेनुसार, भारतीय हवाई क्षेत्र आता व्यावसायिक उड्डाणांसाठी पूर्णपणे खुले करण्यात आले आहे. यासोबतच भारत आणि पाकिस्तानमधील तणावादरम्यान बंद असलेले विमानतळ उघडण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. ३२ विमानतळांसाठी जारी केलेले निर्देश रद्द करण्यात आले आहेत.

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतरचा हा निर्णय, पूर्वी प्रतिबंधित असलेल्या सर्व क्षेत्रांमध्ये सामान्य विमान वाहतूक क्रियाकलाप पुनर्संचयित करण्याचे संकेत देत आहे. या निर्णयामुळे हवाई वाहतूक कोंडी कमी होईल आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांना फायदा होईल.

## सिंदूरचा उल्लेख करत नवनीत राणा यांना पाकिस्तानातून जीवे मारण्याची धमकी, तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आमच्याकडे तुझ्याबद्दल पूर्ण माहिती आहे. हिंदूशेरणी तुला काही दिवसांत आम्ही संपवून टाकू. ना सिंदूर राहील आणि ना सिंदूर लावणारी राहील. पाकिस्तानातून वेगवेगळ्या नंबरवरून हे कॉल मध्यरात्रीनंतर आले आहे. या संदर्भातली माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. केंद्रीय एजन्सींना कळविण्यात आले आहे. यापूर्वी सुद्धा नवनीत यांना जीव मारण्याचा धमक्या आल्या होत्या. सध्या त्यांना केंद्र सरकारची वाय दर्जाची सुरक्षा आहे.

थेट पाकिस्तानमधून जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानं नवनीत राणा यांनी मुंबईतील खार पोलीस ठाणे गाठलं आहे. तर तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती नवनीत राणा यांनी दिली आहे. याबाबत काही वेळात सविस्तर माहिती दिली जाईल असं त्यांनी स्पष्ट केलंय.

नवनीत राणा या अमरावतीच्या खासदार असताना त्यांना अनेकदा जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. आता काही महान्यांपूर्वी हैदराबाद येथून एका पत्राद्वारे त्यांना धमकी



देण्यात आली होती. नवनीत राणा यांच्या जीवाला धोका असल्यामुळं केंद्र सरकारने त्यांना वाय दर्जाची सुरक्षा दिली आहे. पाकिस्तानातून मिळालेल्या धमकीमुळं मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत केंद्रीय सुरक्षा यंत्रणेला माहिती देण्यात आली. खार पोलीस ठाण्यात तक्रार देताना नवनीत राणा यांच्यासोबत त्यांचे पती रवी राणा हेदेखील उपस्थित आहेत.

**बकरी की अम्मा कब तक खैर मनायेगी – राणा**

'ऑपरेशन सिंदूर'नंतर नवनीत राणा यांनी मोदी सरकारचे कौतुक केले होते. नवनीत राणा म्हणाल्या की, 'घर मे घुसकर मारा है, कबर तुम्हारी खोदी है. देश की गद्दी दिल्ली पर बाप तुम्हारा मोदी बैठा हैक्या बोलते छोटे पाकिस्तान, बकरी की अम्मा कब तक खैर मनायेगी. चुन चुन कर मारेंगे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी धन्यवाद आणि अभिनंदन करते. घर मे घुसके मारेंगे, हे काय असते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दाखवून दिले आहे'.

## संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे सुतोवाच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

भारत आणि पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत वर्षा निवासस्थानी झाली. या बैठकीत राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुद्धा उपस्थित होते. भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चड्ढा, कर्नल संदीप सील,



भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन हे बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची यावर प्रामुख्याने चर्चा या बैठकीत झाली. संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर चर्चा झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदुर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्यूट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्वपूर्ण आहे.

भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणार्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करुया.


राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री सचिवालयातील सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच मुंबई जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी आणि इतर विभागांचे अधिकारी सुद्धा उपस्थित होते.

## पाकिस्तानी लष्कराला तडाखा! १०० दहशतवाद्यांचाही खात्मा झाल्याची सैन्यदलाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्यदलांनी केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये किमान १०० दहशतवादी आणि पाकिस्तानचे ३५ ते ४० सैनिक मारले गेल्याची माहिती लष्करी संचालनाचे महानिर्देशक (डीजीएमओ) लेफ्ट. जनरल राजीव घई यांनी दिली. पाकिस्तानी लष्कराच्या कारवाईला दिलेल्या प्रत्युत्तरात त्यांचे मोठे नुकसान झाल्याचेही ते म्हणाले. यापुढे कोणतीही आगळीक झाली, तर त्याला अधिक तीव्र प्रत्युत्तर देण्यात येईल, अशा शब्दांत पाकिस्तानला खडसावण्यात आले आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर २४ तासांनी तिन्ही सैन्यदलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन चार दिवस चाललेल्या या मोहिमेची




पुराव्यांसह सविस्तर माहिती दिली. लष्कर, हवाई दल आणि नौदलाच्या सुयोग्य समन्वयातून अचूक आणि जलदगतीने मोहिमा फत्ते केल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. ही कारवाई नेमके लक्ष्य समोर ठेवून, मोजूनमापून आणि तणाव वाढणार नाही, हे लक्षात घेऊन करण्यात आली. मात्र भारताच्या सार्वभौमत्वाला यापुढे कुणी आव्हान दिले, तर निर्णायक कारवाई केली जाईल, असा इशारा घई यांनी यावेळी दिला. त्यांच्याबरोबर हवाई दलाचे अधिकारी एअर मार्शल ए. के. भारती आणि नौदलाचे अधिकारी व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद उपस्थित होते. पहलगाम हल्ला करणारे आणि त्याचा कट आखणाऱ्यांना योग्य धडा शिकविण्यासाठी या मोहिमेचे अत्यंत काटेकोर नियोजन करण्यात आल्याचे घई यांनी स्पष्ट केले. यामध्ये १०० दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश आले असून आयसी-८१४ विमान अपहरण आणि पुलवामा हल्ल्याच्या कटात सहभागी असलेले युसूफ अझर, अब्दुल मलिक रौफ आणि मुदस्सिर अहमद यांच्यासारखे दहशतवाद्यांचे म्होरकेही ठार झाले आहेत.

भारताने केलेल्या या कारवाईनंतर पाकिस्तानी सैन्याकडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले गेले. सीमेवर तोफगोळ्यांचा मारा आणि महत्त्वाच्या शहरांवर ड्रोन-क्षेपणास्त्रांद्वारे हल्ले चढविण्यात आले. भारताच्या मजबूत हवाई संरक्षण यंत्रणांनी तसेच सीमेवर तैनात जवानांनी सर्व हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले.

## 'किंग कोहली'ची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती; १४ वर्षांचा 'विराट' प्रवास थांबवला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

भारतीय संघाचा आधारस्तंभ, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडत विक्रमांची शिखरं सर करणारा शिलेदार आणि 'जगात भारी' मानल्या जाणाऱ्या क्रिकेटवीरांमधला एक महान खेळाडू विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीसंदर्भातील बीसीसीआयला कळवल्याची माहिती समोर आली होती. बीसीसीआयने त्याला आपल्या निर्णयावर पुन्हा विचार करण्याची विनंतीही केली होती. पण विराट कोहली आपल्या निर्णयावर ठाम राहिला. सोशल मीडियावरून एक पोस्ट शेअर करत विराट कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली आहे. आपल्या १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत विराट कोहलीनं ३० शतके आणि ३१ अर्धशतकांसह ७ द्विशतके झळकावल्याचा रेकॉर्ड आहे.

**खास पोस्टमध्ये काय म्हणाला कोहली?**

आज कसोटी क्रिकेटमध्ये १४ वर्षांचा प्रवास पूर्ण झाला. व्हाइट कपड्यांमध्ये टीम इंडियाकडून पदार्पण केले त्यावेळी हा प्रवास एवढा मोठा असेल याची कल्पनाही केली नव्हती. क्रिकेट कारकिर्द बहरण्यात कसोटी हा महत्त्वाचा भाग होता. इथं खूप काही



शिकलो. कसोटी खेळणं हा एक वेगळाच अनुभव होता. या प्रवासातील छोटे मोठे क्षण कायम आठवणीत राहतील.

### विराट कोहलीची कसोटी कारकिर्द

विराट कोहलीनं २० जून २०११ मध्ये वेस्ट इंडिज विरुद्धच्या सामन्यातून कसोटीत पदार्पण केले होते. १२३ कसोटी सामन्यात ३० शतकांसह ३१ अर्धशतकांच्या जोरावर त्याने कसोटीत ९२३० धावा केल्या आहेत. कसोटीत सर्वाधिक ७ द्विशतकाचा विक्रम त्याच्या नावे आहे. २५४ ही कसोटीतील विराट कोहलीची सर्वोच्च धावसंख्या राहिली आहे.

आता या प्रकारातून निवृत्ती घेतोय. हा निर्णय घेणं सोपे नव्हते. पण हीच योग्य वेळ वाटते. मी जेवढे दिले त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक मला कसोटी क्रिकटमधून मिळाले. अशा आशयाच्या भावनिक शब्दांत त्याने कसोटी क्रिकेटमधून थांबतोय असे सांगितले आहे.

भारतीय संघाचा आधारस्तंभ, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडत विक्रमांची शिखरं सर करणारा शिलेदार आणि 'जगात भारी' मानल्या जाणाऱ्या क्रिकेटवीरांमधला एक महान खेळाडू विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीसंदर्भातील बीसीसी आयला कळवल्याची माहिती समोर आली होती. बीसीसीआयने त्याला आपल्या निर्णयावर पुन्हा विचार करण्याची विनंतीही केली होती. पण विराट कोहली आपल्या निर्णयावर ठाम राहिला. सोशल मीडियावरून एक पोस्ट शेअर करत विराट कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली आहे. आपल्या १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत विराट कोहलीनं ३० शतके आणि ३१ अर्धशतकांसह ७ द्विशतके झळकावल्याचा रेकॉर्ड आहे.

## संपादकीय ......

# ज्ञानतपस्वी : गौतम बुद्ध

*उभ्या भारतवर्षात ज्ञानक्रांती घडवून आणणारा ऋषितुल्य तपस्वी म्हणून भगवान गौतम बुद्धांचे जीवनकार्य अजरामर ठरले आहे. पौर्णिमेच्या दिवशी जन्म, महानिर्वाण आणि केवलज्ञान प्राप्ती हा अद्भुत योग या महामानवाच्या जीवनात घडून आला. भगवान बुद्धांनी दिव्य ज्ञानाने सबंध जगाला प्रकाशमान करून टाकले आणि भारतमातेचा हा सुपुत्र सामाजिक न्याय आणि समाजक्रांतीचा उद्गाता ठरला. जगाला आज विनाशाकडे नव्हे तर विकासाकडे घेऊन जायचे असेल तर 'युद्ध नको, बुद्ध हवा' हा २१ व्या शतकाचा संदेश होय.*

*इ.स.पूर्व सहावे शतक हे प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देणारे शतक होते. त्यामुळे या शतकाला प्रबोधन युग म्हटले जाते. वैदिक संस्कृतीने निर्माण केलेल्या सामाजिक असमतोल व विषमतेविरुद्ध बंड पुकारून सामाजिक न्यायाचा झेंडा महात्मा गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांनी या शतकात फडकविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत, भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये आपण फ्रेंच राज्य क्रांतीकडून घेतलेली नसून ती भगवान गौतम बुद्धाच्या जीवन चरित्रातून घेतली आहेत. यावरून महात्मा गौतम बुद्धाच्या क्रांतदर्शी विचारांचे पुरोगामित्व सिद्ध होते. बुद्धाचे विचार कार्ल मार्क्सपेक्षाही श्रेष्ठ होते. कारण मार्क्सने केवळ माणसाचा आर्थिक विचार केला तर बुद्धाने माणसाचा आध्यात्मिक व सांस्कृतिक विचार केला. आशा हे दु:खाचे मूळ कारण आहे. मानवी जीवन क्षणभंगूर असून मानवाने आपल्या आशा-आकांक्षा मर्यादित ठेवून 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' काम करावे, असा मोलाचा संदेश भगवान गौतम बुद्धाने उभ्या जगाला दिला.*

*बुद्धांचे सारे जीवन जन्मापासून महानिर्वाणापर्यंत एका ज्ञानयात्रेने संपन्न झाले. ही ज्ञानयात्रा सत्याचा शोध घेणारी होती. त्यांनी केवल ज्ञान प्राप्त केले आणि उभ्या जगाला सत्याचा प्रकाश दाखविला. तत्त्वज्ञाने जग कसे आहे हे केवळ सांगायचे नसते ते बदलून दाखवायचे असते, हा विचार महात्मा गौतम बुद्धांच्या बाबतीत तंतोतत खरा ठरतो.महात्मा गौतम बुद्धांचे जीवन एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे तेज:पुंज होते. मागील १० हजार वर्षांत ज्यांनी बुद्धिमत्ता वापरून मानवजातीच्या उत्थानासाठी महान कार्य केले, अशा जगातील श्रेष्ठ १०० विश्वमानवांची यादी इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड विद्यापीठाने तयार केली. त्या यादीत विद्यापीठाने प्रथम स्थानी तथागत बुद्धांना ठेवले होते. जगातील पहिल्या १०० महान विश्वमानवांमध्ये बुद्ध प्रथम स्थानी आहेत. आचार्य रजनीश बुद्धांबद्दल म्हणतात की, बुद्धानंतर त्यांच्या जवळपास जाऊ शकेल असा महामानव भारताने किंवा जगाने आजपर्यंत निर्माण केला नाही.केवल ज्ञान प्राप्त झाल्यानंतर महात्मा गौतम बुद्धांनी सारनाथ येथील मृगया वनात पहिले प्रवचन दिले. त्या ठिकाणी सम-्राट अशोकाने उभारलेला भव्य स्तंभ महात्मा गौतम बुद्धांच्या विचारांची तेजस्वी पताका आजही फडकत आहे. शाक्यमुनी हे गौतमाचेच दुसरे नाव हा बौद्ध धर्माचा मुख्य स्तंभ. त्यांची जीवनकहाणी, त्यांची प्रवचने आणि त्यांनी घालून दिलेले विहाराचे नियम पवित्र मानून ते त्यांच्या अनुयायांनी गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर संकलित केले. गौतम बुद्धांच्या मानल्या जाणार्या शिकवणुकी एका पिढीकडून दुसर्या पिढीकडे पाठांतराद्वारे सुपूर्द होत गेल्या.*

# घरबसल्या दोन मिनिटात जॉब कार्ड कसे काढायचे? वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२अमरावती**

सध्या महाराष्ट्रातील बहुतांश गावामध्ये घरकुल योजनेतून घरे बांधण्याची कामे सुरु आहेत. शिवाय पंतप्रधान घरकुल योजनेसाठी दुसरा टप्पा देखील सुरु झाला आहे. जर तुम्हालाही घरकुल योजनेसाठी फॉर्म भरायचा असल्यास जॉब कार्ड आवश्यक असते. ते जॉब कार्ड कसे काढायचे? हे आजच्या भागातून जाणून घेऊयात...

सर्वप्रथम जॉब कार्ड काढण्यासाठी, तुम्हाला तुमच्या ग्रामपंचायत कार्यालयात जावे लागेल आणि तेथे अर्ज करावा लागेल. अर्ज भरताना तुम्हाला आवश्यक कागदपत्रे आणि माहिती द्यावी लागेल. या ठिकाणी आधार कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट साईज फोटो आणि जॉब कार्डचा फॉर्म लागेल. या जॉब कार्डवरील माहिती भरल्यानंतर ग्रामरोजगार सेवकाकडे (चछठएत्रऋअ) हा फॉर्म जमा करावा. यानंतर काही दिवसांनी जॉब कार्डचा नंबर दिला जातो.

**जॉब कार्डचा नंबर मिळाल्यांनतर ते डाऊनलोड कसे करायचे, ते पाहूया....**

सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाच्या परीशसरया संकेतस्थळावर भेट द्यावी लागेल.

या ठिकाणी ऋशपशीरींश ठर्शीीी या पर्यायावर क्लिक करा.

यानंतर दिलेल्या राज्यांपैकी आपले राज्य निवडा. (उदा. महाराष्ट्र)

पुढील व्हिडिओमध्ये काही पर्याय दिले असतील. जसे वर्ष, तालुका, ब्लॉक, पंचायत.

ही सर्व माहिती भरल्यानंतर झीलशशव या पर्यायावर क्लिक करा.

यानंतर एक नवीन पेज उघडेल, यात अनेक पर्याय दिसतील. यातील ठ१ जॉब रजिस्ट्रेशन (ठ१ क्षेल 'शिसळीीरींळेप) या कॉलम मध्ये जॉब कार्ड एम्प्लॉयमेंट रजिस्टर (गेल लरीव/शाश्रीशपीं 'शिस-ळींशी) यावर क्लिक करा.

त्यात तुमच्या गावातील जॉब कार्ड बनवलेल्या व्यक्तींची नावे आणि त्यांचे जॉब कार्ड नंबर दिसेल. त्यात तुमचे नाव शोधा. तुमच्या नावासमोर तुमचा जॉब कार्ड नंबर दिसेल. तो तुम्ही सुरक्षितपणे लिहून ठेवा.तसेच ते कार्डही डाउनलोड करता येईल.

# पशुगणना पूर्ण : आठवडाभरात कळेल प्रत्यक्ष वाढ, घटची संख्या

## पहिल्यांदाच प्रगणकाव्दारे ऑनलाईन ॲपद्वारे घेतल्या नोंदी

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२अमरावती** - २१ वी पशुगणना पूर्ण झाली आहे. पुढील पंधरा दिवसात गोळा केलेल्या पशुधनाच्या आकड्यावर अंतिम शिक्कामोर्तब होणार असून येत्या आठवड्याभरात राज्यासह जिल्ह्यातील पशुधनाची माहिती उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यानंतर जिल्ह्यात नेमके किती पशुधन घटले आणि वाढले याचे चित्र स्पष्ट होणार आहे.




पशुगणनेसाठी जिल्ह्यात २२३ प्रगणक व ५६ पर्यवेक्षकांची नेमणूक केली होती. ही पशुगणना पहिल्यांदाच ऑनलाईन अर्थात ॲपद्वारे करण्यात आली पशुगणनेमुळे जिल्ह्यातील पशुधनाची संख्या निर्धारित होऊन त्यानुसार राज्य शासनाला धोरण आखून योजनांची सुसुत्रता करता येणार आहे.यात १६ पशुधन जाती.कुक्कुट पक्षी यांची प्रजातीनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय माहिती गोळा संकलीत केली आहे. २० व्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात गाय वर्गीय, म्हैसवर्गीय असे एकूण ५ लाख ९४ हजार ५९४ इतके पशुधन आहे. याशिवाय मेंढी ८३ हजार २०० आणि शेळी ३४०६८१ आहे.जिल्ह्यात २१ वी पशुगणना गत २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान पशुसंवर्धन विभागाच्या वतीने शहर, ग्रामीण भागात करण्यात आली. या पशुगणनेची माहिती ऑनलाईन पध्दतीने नोंदविली आहे. २१ व्या पशुगणनेमुळे पशुधन क्षेत्रात सुधारणा घडविण्यासाठी ही पशुगणना महत्त्वाची ठरणारी आहे.

२१ वी पशुगणना पूर्ण झालेली आहे. या गणनेची अधिकृत माहिती ही शासनस्तरावर आहे. यावर अंतिम शिक्क केल्यानंतरच जिल्ह्याची आकडेवारी उपलब्ध होईल.

**-डॉ. संजय कावरे, उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग.**

### १६ प्रकारच्या पशुधनाची माहिती


एक विसाव्या पशुधन गणनेत जिल्ह्यात प्रगणकांकडून गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी व कुक्कुटपालन, भटक्या प्राण्यांसह १६ प्रकारच्या १६ पशुधन जाती, माहिती संकलित करण्यात आली आहे.




# स्ट्रेस दूर करण्यासाठी जाणून घ्या, फायदेशीर उपाय

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत ताण-तणाव (स्ट्रेस) हे सामान्य झाले आहे. काम, शिक्षण, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक आयुष्य यांच्यात समतोल राखताना अनेकदा मानसिक व शारीरिक तणाव वाढतो. स्ट्रेस पूर्णपणे टाळणे शक्य नसले तरी तो योग्य प्रकारे नियंत्रित करता येतो. यासाठी काही प्रभावी उपाय आहेत, जे तुमच्या दैनंदिन जीवनशैलीत समाविष्ट केल्यास तुम्ही अधिक आनंदी, शांत आणि स्ट्रेसमुक्त राहू शकता.



**१. नियमित व्यायाम करा** - स्ट्रेस कमी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे व्यायाम. नियमित चालणे, धावणे, योगा, जिम किंवा एखादी फिजिकल ॲक्टिव्हिटी केल्याने शरीरात एंडॉर्फिन नावाचे हॉर्मोन तयार होते, जे तुमच्या मूडला फ्रेश ठेवतात व मानसिक ताण कमी करतात.

**२. ध्यान आणि योगाचा सराव**- प्रत्येक दिवशी १० ते १५ मिनिटे ध्यान किंवा योग केल्याने मन शांत राहते आणि स्ट्रेस दूर होतो. योगामुळे शारीरिक आणि मानसिक समतोल राखला जातो, ऊर्जा टिकून राहते आणि तुमचं एकंदर आरोग्य सुधारतं.

**३. वेळेचे योग्य व्यवस्थापन** - ज्यावेळी काम वेळेत पूर्ण होत नाही, तेव्हा स्ट्रेस वाढतो. म्हणूनच कामांची प्राधान्यक्रमानुसार यादी करा, छोटे-छोटे ब्रेक घ्या आणि कामाचे छोटे विभाग पाडून ते पूर्ण करा. यामुळे स्ट्रेस टाळता येतो.

**४. सकारात्मक विचार ठेवा**

नकारात्मक विचार टाळा आणि 'मी हे करू शकतो/शकते' अशी मानसिकता ठेवा. हे तुमच्या आत्मविश्वासाला चालना देतं.

**५. स्वत:साठी वेळ द्या** - तुमच्या मन:शांतीसाठी स्वत:साठी वेळ देणं अत्यंत महत्त्वाचं आहे. आवडती पुस्तके वाचा, संगीत ऐका किंवा निवांतपणे विश्रांती घ्या. यामुळे तुम्ही ताजेतवाने होता आणि दिवसभराची मानसिक थकवा दूर होतो.

**६. सपोर्ट सिस्टीम तयार ठेवा**- कधीही तणाव वाटल्यास जवळच्या व्यक्तींशी संवाद साधा. कुटुंबीय आणि मित्रांच्या सहवासात वेळ घालवल्याने मानसिक आधार मिळतो आणि मन हलकं वाटतं.

**७. संतुलित आहार घ्या** - स्ट्रेस कमी करण्यासाठी योग्य आहारही महत्त्वाचा आहे. जीवनसत्त्वे, प्रथिने आणि फायबर्सयुक्त आहार घ्या. चहा, कॉफी आणि साखरेचं प्रमाण कमी करा कारण हे स्ट्रेस वाढवू शकतात.

स्ट्रेस ही आजच्या युगातील एक अपरिहार्य गोष्ट आहे, पण योग्य सवयी आणि सकारात्मक जीवनशैलीमुळे तुम्ही त्यावर नियंत्रण मिळवू शकता. आजच या ७ उपायांचा आपल्या जीवनशैलीत समावेश करा आणि तणावमुक्त जीवनाचा अनुभव घ्या.

# एक एकरात किती रोपे? जाणून घ्या 'या' सूत्राच्या मदतीने शेतातील एकरी रोपांची संख्या

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगाम तोंडावर आला असून राज्यात सर्वत्र शेतकरी बांधव त्यानुसार तयारी करत आहेत. तसेच कृषी विज्ञान केंद्रे व कृषी विभाग यांच्या मार्फत शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याच्या विविध तंत्रांची माहिती दिली जात आहे.

शेतामध्ये विविध पिके घेत असताना त्या-त्या पीकपद्धतीनुसार योग्य नियोजन करणे आवश्यक असते. जसे की मशागत, प्रमाणित व उगमक्षम बियाण्यांची निवड, योग्य अंतरावर लागवड, आंतरमशागत, खत व्यवस्थापन, काढणी या सर्व बाबींचे योग्य व्यवस्थापन झाले तरच चांगले उत्पादन मिळते आणि परिणामी चांगले उत्पन्न प्राप्त होते.आज आपण याच अनुषंगाने पिकांची लागवड करताना एकरी रोपांची संख्या कशी काढावी याविषयी सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत.

**पिकांचे अंतर मोजणे**




**गरजेचे!**

प्रत्येक पिकासाठी विशिष्ट अंतर ठेवावे लागते. जसे की टोमॅटोसाठी २ ु १ फूट अंतर, ऊसासाठी ५ ु २.५ फूट, कांद्यासाठी ६ ु ४ इंच इत्यादी. या अंतरानुसार एका एकरात किती रोपं लावता येतील हे ठरवता येते.

**एकर म्हणजे किती क्षेत्रफळ?**

१ एकर म्हणजे ४३,५६० चौ.फूट हे लक्षात घेऊन आपण एका रोपासाठी लागणारे क्षेत्र मोजतो आणि नंतर एकूण क्षेत्रफळातून हे भागून एकरी रोपांची संख्या काढता येते.

**एकरी रोपांची संख्या काढण्याचा सूत्र**

एकरी रोपांची संख्या = ४३,५६० ह्व (ओळीतील अंतर ु रोपातील अंतर)






टिप : हे अंतर फूट किंवा इंचातच असावे, आणि दोन्ही एकक एकसारखे असावेत.

उदाहरणासाठी काही रोपांची संख्या लक्षात घेऊया!

उदाहरण १ : टोमॅटोसाठी २ फूट ु १ फूट अंतर

४३,५६० ह्व (२ ु १) = २१,७८० रोपं प्रति एकर.

उदाहरण २ : ऊसासाठी ५ फूट ु २.५ फूट अंतर

४३,५६० ह्व (५ ु २.५) = ३,४८४ रोपं प्रति एकर.

उदाहरण ३ : कांद्यांसाठी ६ ु ४ इंच मात्र आता येथे इंचाचे फूटमध्ये रूपांतर करावे लागेल त्यानुसार ६ इंच = ०.५ फूट, ४ इंच = ०.३३ फूट (अंदाजे).

४३,५६० ह्व (०.५ ु ०.३३) = सुमारे २८,७४९ रोपं प्रति एकर.

**मोकळ्या जागेचा विचार**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

एकरी रोपांचे हे गणित करताना बांध, पायवाट, सिंचन इत्यादींसाठी लागणाऱ्या जागेचा विचार करून थोडी कपात करावी. साधारणतः १०% जागा अशी वापरली जाते. त्यामुळे अंतिम एकरी रोपांची संख्या अंदाजे ९०% घेतली जाते.

उदा. टोमॅटोचे २१,७८० ु ९०% = सुमारे १९,६०२ रोपं प्रति एकर.

**फायद्याचे 'हे' गणित**

रोपांची संख्या योग्य प्रकारे काढल्यास पिकांची घनता, उत्पादन व खर्च याचे योग्य नियोजन करता येते. यामुळे उत्पन्न वाढते आणि नफा जास्त होतो. पेरणीपूर्वी हे गणित शेतातच करून पाहणे फायद्याचे ठरते.

# महानिर्मितीमध्ये मोठी संधी; १४० पदेना परीक्षा, ना मुलाखत; अर्ज दाखल करण्यास एक महिन्याची मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

बेरोजगार उमेदवारांना महानिर्मिती कंपनीमध्ये नोकरीची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. महानिर्मितीच्या पारस येथील औष्णिक विद्युत केंद्रामध्ये विविध १४० पदांवर आयटीआय शिकाऊ उमेदवारांची नियुक्ती केली जाईल. त्यासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले.

**नोकरी विशेष**

उमेदवारांना ९ मेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. प्रशासनाने आता त्यामध्ये आणखी एका महिन्याची वाढ केली असून पात्र उमेदवारांना ९ जूनपर्यंत अर्ज दाखल करता येतील. शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानिर्मितीच्या पारस येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या आस्थापनेवर २०२५-२६ या सत्रासाठी आय.टी.आय. शिकाऊ उमेदवारांच्या जागा भरल्या जाणार आहेत.




टर्नर (कातारी) आठ, मशिनिस्ट (यांत्रिकी) सात, इलेक्ट्रिशियन (विजतंत्री) २५, वायरमन (तारतंत्री) १०, फिटर (जोडारी) ३०, वेल्डर (संधाता) ३०, कोपा १०, मेकॅनिक डिझेल १५, प्लंबर (नळ कारागीर) पाच अशा एकूण १४० जागा भरल्या जाणार आहेत. आय.टी.आय. उत्तीर्ण शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणासाठी उमेदवार ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया http://www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर सुरू आहे. नोंदणी तसेच प्रोफाईल अद्ययावत करून संकेत स्थळावरील आस्थापना कोड क्र. ई१०१६२७००६९५ पर्याय निवडून ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. इच्छूक उमेदवाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसाय परीक्षेत मागासवर्गीय उत्तीर्ण उमेदवारास कमीत कमी ५५ टक्के गुण व खुल्या प्रवर्गातील कमीत कमी ६० टक्के गुण आवश्यक आहे.

कागदपत्रे संबंधित पात्र उमेदवारांनी संकेतस्थळावर अपलोड करावे लागतील. त्यामध्ये आयटीआय एकत्रित अंतिम सेमिस्टरची गुणपत्रिका, इयत्ता १० ची गुणपत्रिका, रहिवासी दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराच्या छायाचित्राचा समावेश आहे. स्थानिक उमेदवारांसाठी प्रकल्पबाधित गावे अंतर्गत पारस, कोळासा, मनारखेड, मांडोली, सातरगांव आदी गावे येतात. महानिर्मिती कंपनीतील प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आवश्यक राहील.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १२ मे २०२५ शहर/ग्रामिण


## ग्रीननेट ने जमले नाही,आता राखेभोवती लावले मातीचे ढिगारे

## जांडू कन्स्ट्रक्शन समोर प्रशासन नतमस्तक

### राख हलविल्याशिवाय नाही पर्याय

मंगेश तायडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२नांदगाव पेठ-** राष्ट्रीय महामार्गावरील रहाटगाव रिंगरोड येथे उड्डाणपुलाचे बांधकाम करणाऱ्या जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीकडून मोठ्या प्रमाणात अनधिकृत राख साठवण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना आणि वाहनचालकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वाऱ्यामुळे उडणारी ही राख थेट चालकांच्या डोळ्यात जात असल्याने अपघाताचा धोका वाढत आहे.माध्यमांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर आणि पत्रकार मंगेश तायडे यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार सादर केल्यानंतर कंपनीने राखेभोवती ग्रीन नेट बसवली. मात्र, ही उपाययोजना अपुरी ठरली असून राखेचे उडणे सुरूच आहे. परिणामी, प्रशासनाच्या दबावामुळे जांडू कन्स्ट्रक्शनने राखेभोवती आता मातीचे ढिगारे साठवले, परंतु हे प्रयत्नही निष्फळ ठरत असल्याचे दिसत आहे. गत आठवड्यात राख उडत असल्यामुळे जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने प्रशासनाच्या दबावाला कंटाळून राखेभोवती ग्रीन नेट बसविली मात्र दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या वातावरण बदलामुळे व प्रचंड हवेमुळे ही राख महामार्गावर उडून चालक,प्रवासी व नागरिकांच्या डोळ्यात शिरत आहे.यामध्ये दोन तीन छोटे अपघात देखील झालेत मात्र तारीख निर्लज्ज प्रशासन कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे दिसत आहे. यातच प्रदूषण विभागाने ही राख उडत असल्याचे थांबत नसल्यामुळे



जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीला राखेभोवती मातीचे ढिगारे लावण्याचा सल्ला दिला मात्र तोही कुचकामी ठरत असल्याचे दिसत आहे.

यामुळे स्पष्ट होते की, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका आणि तहसील कार्यालयातील संबंधित अधिकारी जांडू कन्स्ट्रक्शनच्या प्रभावाखाली काम करत असून नागरिकांच्या जीविताशी खेळ केला जात आहे. उडणाऱ्या राखेमुळे परिसरातील हवामानात प्रदूषणाचा स्तर वाढला असून नागरिकांना श्वसनाचे त्रास जाणवू लागले आहेत.या प्रकरणी शिवसेना (उबाठा गट) चे अमरावती तालुका प्रमुख नितीन हटवार यांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रदूषण विभागाला घेराव घालण्याचा इशारा दिला आहे. जनतेचा जीव धोक्यात घालून काही अधिकारी मलई खात आहेत, हे सहन केले जाणार नाही, असा इशारा हटवार यांनी दिला.जर तत्काळ योग्य उपाययोजना न करण्यात आल्यास ही समस्या गंभीर रूप धारण करेल. प्रशासनाने जनतेच्या जीविताला प्राधान्य देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## जलसंधारणातून.... ग्रामसमृद्धीकडे

## यावली (श) येथे जलतारा कामाचा भव्य शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२नांदगाव पेठ**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत ग्रामपंचायत यावली (श) व कृषी विभाग, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने यावली शहीद येथे १० मे रोजी जलतारा कामाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष तथा राज्य मंत्री दर्जाचे निलेश हेलांडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी मा. उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा समन्वयक रामेश्वर परळकर, तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी कु. अंकिता लाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात तालुका कृषी अधिकारी श्री. पंकज देशमुख यांच्या प्रस्तावनेने झाली. त्यानंतर आपल्या भाषणात निलेश हेलांडे पाटील यांनी जलतारा हा भूगर्भातील जलसाठा वाढवणारा, साधा, सोपा व कमी खर्चिक परंतु अत्यंत प्रभावी उपाय आहे. जलताराची हमी - प्रत्येक शेताला होईल पाणी, असे सांगत जलताराचे महत्त्व अधोरेखित केले.उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी मनरेगाच्या माध्यमातून जलतारा कसा व कुठे करावा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी जलतारामुळे भविष्यात होणारे फायदे व त्याचा शाश्वत परिणाम यावरही प्रकाश टाकला. शुभारंभ कार्यक्रमास ग्रामपंचायत यावली (श) च्या सरपंच शिल्पा तुषार खवले, ग्रामविकास अधिकारी दिनेश मोहोड, अतुल यावलीकर, गणेश भोपळे, सुरज लंगडे, मयूर कांडलकर तसेच अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन ग्रामरोजगार सहाय्यक अक्षय भोपळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृषि सहाय्यक ज्योती ठाकरे यांनी केले.--

## नूतन विदर्भ शिक्षण मंडळाची नूतन कार्यकारणीचे गठन

## अध्यक्षपदी ॲड. आनंद. एम. परचुरे तर सचिव पदी एन. डब्लू. सोमण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती-** कै. श्री. दादासाहेब खापर्डे यांनी स्थापन केलेल्या नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, जोग चौक, अमरावती या संस्थेची आमसभा रविवार, दिनांक ११ मे २०२५ रोजी पार पडली. सदर आमसभेत संस्थेच्या घटनेनुसार सर्वानुमते नवीन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले.सदर आमसभा संस्थेच्या कार्यालयात अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष हे नागपूरचे प्रथितयश ज्येष्ठ विधिज्ञ आहेत. त्यांचे अनेक सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थेशी जवळचे संबंध असून समाजातील गणमान्य व्यक्ती म्हणून ते ख्यातीप्राप्त आहेत. मागील नऊ वर्षे डॉ. सौ. माया व्ही. शिराळकर यांनी संस्थेचे अध्यक्ष पद कुशलतेने सांभाळले. त्या संस्थेच्या पहिल्या महिला अध्यक्ष राहिल्या. त्या शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेच्या संचालक राहिल्या आहेत तसेच त्यांचाही सामाजिक संपर्क दांडगा असून त्या शारदा उद्योग मंदिर, अमरावती च्या विद्यमान उपाध्यक्ष आहेत.कार्यकारिणीतील इतर



पदाधिकारी विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत गणमान्य व्यक्ती असून सामाजिक बांधिलकीतून कार्यकारिणी व आजीव सदस्य श्री. के. एम. कुळकर्णी, ॲड. सौ. एल. एच. पांगारकर, श्री. के. व्ही. पातुरकर संस्थेचे कार्य करीत आहेत.संस्थेव्दारा न्यू हायस्कूल मेन, नूतन कन्या शाळा, न्यू हायस्कूल बेलपुरा व महिला महाविद्यालय या तीन शाळा व एक वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी चालविले जाते. कार्यकारिणी व्दारा सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये सद्यस्थितीनुसार आधुनिक उपकरणांसह विज्ञान, संगणक, अटल टिंकरिंग इत्यादी प्रयोगशाळा, वातानुकुलित स्मार्ट क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालये, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, सौर उर्जा निर्मिती प्रकल्प, बी. व्होक. अंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रम इत्यादी विकासात्मक कार्ये केल्या गेली.

शाळा व महाविद्यालयात झालेली विकासकार्ये कार्यकारिणीने उपलब्ध असलेल्या निधीतून वेळोवेळी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाकरिता तसेच त्यांच्या भविष्यातील जडणघडणीला नजरेसमोर ठेऊन केलेली आहे. संस्थेच्या या विकासात्मक वाटचालीत पदाधिकारी, संस्था प्रमुख, आजीवन सभासद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संस्थेच्या कार्यात हिरीरीने अग्रेसर असलेली युवा चमू यांचा देखील मोलाचा वाटा आहे.

### नवनियुक्त कार्यकारिणी पदाधिकारी

१ अध्यक्षॲड. श्री. आनंद. एम. परचुरे२ ज्येष्ठ उपाध्यक्षडॉ. सौ. एम. व्ही. शिराळकर३ उपाध्यक्षडॉ. एस. डी. कसबेकर४ उपाध्यक्षपं. के. व्ही. नवसाळकर५ सचिवश्री. एन. डब्लू. सोमण६ सहसचिवश्री. पी. एस. पात्रीकर७ सहसचिवश्री. पी. आर. पानसे८ मंडळ प्रतिनिधीश्री. आर. जी. खांडेकर९ मंडळ प्रतिनिधीश्री. एस. आर. गोडबोले१० सदस्यसौ. एम. पी. पांडे११ संस्था प्रमुखडॉ. ए. बी. मोहरील१२ संस्था प्रमुखश्री. ए. एम. निंबोळे१३ संस्था प्रमुखश्रीमती जे. एस. पांडे

## लग्नाला विरोध करणाऱ्या विवाहित प्रेयसीवर चाकूहल्ला

## प्रियकरासह एकाला अटक, तपोनेश्वर येथील घटना



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२अमरावती** - प्रियकराचे लग्न जुळल्यानंतर विभक्त राहणाऱ्या विवाहित प्रेयसीचा विरोध असल्यामुळे प्रियकराने साथीदाराच्या मदतीने तिला तपोनेश्वर नेले आणि तिच्या. पोटावर, मानेवर आणि छातीवर चाकूने सपासप वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना रविवारी दुपारी फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या घटनेत पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. राहुल तंबोले आणि पीयूष हर्षे अशी अटकेतील युवकांची नावे आहेत.

पीडित विवाहित महिलेचे पतीसोबत पटत नसल्यामुळे ती तिच्या १८ वर्षाच्या मुलासोबत राहत होती. २ ते ३ वर्षापूर्वी तिची ओळख राहुल तंबोले सोबत झाली आणि त्यांच्यात प्रेमसंबंध जुळले. तेव्हापासून ती राहुलसोबत रिलेशनमध्ये समाधाननगर येथे राहत होती आणि तिचा मुलगासुध्दासोबतच राहत होता. दोघेही पती-पत्नी सारखे राहत होते. दरम्यान काही दिवसाआधी राहलचे एका मुलीसोबत लग्न जुळले. याबाबत तिला माहिती मिळताच त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. त्यामुळे राहुलने तिची समजुत काढण्याचा प्रयत्न केला परंतु ती ऐकत नव्हती. राहुलच्या लग्नाची तारीख जवळ होती आणि रविवारी सायंकाळी त्याच्या हळदीचा कार्यक्रमसुध्दाहोता. परंतु प्रेयसी काही तरी करणार या भीतीने राहुलने तिला विश्वासात घेतले आणि दुपारी तिला घेऊन दुचाकीने तपोनेश्वरला घेऊन गेला.त्या ठिकाणी थांबून समजविण्याचा प्रयत्न केला मात्र प्रियसी समजत नसल्याने आपल्या मित्रांसोबत प्रियसी वर चाकूने सपासप वार केले.व तिथून फरार झाला पोलिसांनी तात्काळ महिला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

## वहिवाटीच्या रस्त्यावर बांधले सिमेंट क्रॉक्रिटचे घरअतिक्रमित घर

## गुरांच्या गोठ्यावर गजराज, महसूल विभाग व शिरखेड ग्रापं. ची कार्यवाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२शिरखेड** - शेतकऱ्याच्या वहिवाटीच्या रस्त्यावर शासनाच्या जागेवर येथील दिलीप खराते यांनी सिमेंट कॉंक्रीटचे पक्के घर बांधले होते. तसेच गावातील नागरिकांनी गुरांचे गोठे बांधले होते. हे सर्व अतिक्रमण सर्वे नं. ७३ वर बांधण्यात आले होते. ही जागा शासनाची असल्याने १० मे रोजी सकाळी ११:०० वाजता पासून महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात शिरखेडग्रामपंचायत प्रशासनाने गजराज चालवून अतिक्रमण हटविले. वहिवाटीच्या वसरकारी जागेवर दिलीप संभाजी खराते यांनी २०१७ व २०१८ मध्ये अतिक्रमणकरून जागेत घराचे बांधकाम केल. त्यांना वेळोवेळी नोटीसेस देण्यात आल्या. मासिक सभा ठराव




मंजूर करून कळविले. परंतु त्यांनी नोटीस ला न जुमानता अतिक्रमण जागेत बांधकाम केले. त्यामुळे त्यांना ३० जुलै २०२४ ला अंतिम नोटीस देण्यात आली असता त्यांनी नोटीस ला मा. अप्पर आयुक्त कार्यालयात दाद मागितली. त्यानंतर त्यांना १२ ऑगस्ट २०२४ ला स्टे मिळाला आणि २६ ऑगस्ट २०२४ पासून तारीख सुरू झाली. या केस मधे ५ मे २०२५ झालेल्या सुनावणी मध्ये अतिक्रमण काढण्यावर दिलेला स्टे उठविण्यात आला. त्यामुळे ग्रामपंचायत ने कायदेशीर बाबीचा अवलंब करून १० मे २०२५ लाला रितसर पोलिस बंदोबस्त मागवून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली. सोबतच त्याच परिसरात असलेले पाच अतिक्रमण काढण्यात आले.यावेळी सरपंच मीना मोहोळ, उपसरपंच उज्वला देशमुख, तहसीलदार विनोद वानखडे, गट विकास अधिकारी उज्वला ढोले, सहा. गट विकास अधिकारी प्रीती खटिंग, नायब तहसीलदार चारुदत्त पाटील, शिरखेड ठाणेदार सचिनलुले, पी.एस.आय. ठाकरे, बीट अंमलदार पुंजाराम मेटकर, अंमलदार संजय वाघमारे, महिला पो.कॉ. जयश्री दहीहांडे, पो.कॉ. पुनम उकंडे, ग्राम पंचायत अधिकारी संजय दोड, ग्राम महसूल अधिकारी अंकुश देशमुख, ग्रा.पं. कर्मचारी उमेश देशमुख रोजगार सेवक वासुदेव बावणे, संगणक चालक तुषार तट्टे, युवा प्रशिक्षणार्थी आशिष बोरकर आणि पत्रकार उपस्थित होते.

### पोलिसांचा गावात कारवाई दरम्यान चोख बंदोबस्त

# आर्थिकदृष्टदल घटकातील मुलीचे पालकत्व स्वीकारुन कन्यादान

## संतोष महात्मेंचे सामाजिक दायित्व



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती,–** आर्थिक दुर्बल घटकातील एका मुलीच्या आरोग्यापासून ते शैक्षणिक जबाबदारी पूर्ण केले. एवढेच नाही तर तिचे पालकत्व स्वीकारत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी त्या मुलीचे कन्यादानाची जबाबदारी देखील पूर्ण केली. या मंगलमय सोहळ्याला माजी लेडी गवर्नर कमलताई गवई यांच्यासह माजी जिप अध्यक्ष सुरेखा ठाकरे, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संतोष महात्मे यांनी एक सामाजिक दायित्व पूर्ण करून समाजाला अशा आर्थिक दुर्बल चटकातील मुला मुलींना मदत करण्याचा एकसंदेश दिला आहे.मागील काळामध्ये जिल्ह्यात लहान मुलांच्या आरोग्याविषयी मोठ्या प्रमाणात प्रश्न निर्माण झाला होता. लहान बालकांना पुरेशा आरोग्यविषयक व पौष्टिक आहाराच्या अभावाबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातम्या प्रकाशित होत होत्या. या अनुषंगाने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून परिसरातील आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या कुटुंबातील लहान मुलांचे शिक्षण व आरोग्य विषयक संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा उपक्रम राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी हाती घेतला. त्यावेळी या उपक्रमाला वाठोडा शुक्लेश्वर परिसरातील ग्रामस्थांनी मोठा पाठिंबा दिला होता. या अनुषंगाने वाठोडा शुक्लेश्वर येथीलरीनाच्या संगोपनाची जबाबदारी शुभांगी व संतोष महात्मे यांनी घेतली. कालांतराने रीनाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लग्न करण्याचे ठरले. तिचे मंगल परिणय पार पाडण्याची जबाबदारी वाठोडा शुक्लेश्वर वाशीयांन सोबत संतोष महात्मे यांनी घेतली. आपली जबाबदारी पार पाडताना रिनाचेकन्यादान शुभांगी व संतोष महात्मे यांनी केले. यावेळी पार पडलेल्या या मंगल परिणयामध्ये परिसरातील ज्येष्ठ सामाजिक व आध्यात्मिक व्यक्तिमत्व लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखा ठाकरे यांचे सह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या सामाजिक मंगल सोहळा च्या यशस्वी आयोजनाकरिता रविभाऊ बुरघाटे, पुष्कर निमकर, राजेंद्र बोडखे, बाळासाहेब साखरे, मदन साखरे, जावेद पठान, शकील अंसारी, शाम चाहाकार, अनीस हातम राजेश बरवे, निलेश मोपारी, सोमेश्वर गावंडे यांचेसह व वाठोडा शुक्लेश्वर ग्रामस्थांचे विशेष सहकार्य मिळाले.


# विजेच्या धक्क्याने मृत झालेली बुरहानच्या जंगलातील वाघिण मेळघाटातील

## वाघिणीच्या पोटातून काढण्यात आले ३ शावक

### बुरहानपुरचे वन मंडळ अधिकारी विद्या सिंह यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२चिखलदरा –** महाराष्ट्रातील सातपुडा पर्वताला लागूनच असलेल्या मध्यप्रदेशाच्या शाहपुर वनपरीक्षेत्रातील जम्बुपाणीच्या जंगलात ४ मे रोजी एका गर्भवती वाघिणीचे शव प्राप्त झाले होते. ती वाघिण मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील असून तिच्या पोटातून ३ शावक काढण्यात आले होते, अशी माहिती बुरहानपुरचेवनमंडळ अधिकारीविद्या भुषण सिंह यांनी प्रसार माध्यमांना दिली. वाघिणीचा मृत्यू करंट लागून झाला असल्याचे देखील स्पष्ट झाले आहे.

भारतात टायगर स्टेट म्हणून नामांकित असलेल्या मध्यप्रदेशातील मेळघाटच्या जंगला जवळच्या बुरहानपुर जिल्ह्यातील जम्बुपाणीच्या जंगलातील बीट चौकी क्रमांक ४२८ मध्ये ४ मे रोजी गस्तीवर असलेलया वन रक्षकांना एक गर्भवती वाघिण मृत सापडली होती. वनमंडळ अधिकारी विद्या भुषणसिंग यांनी प्रेसला दिलेल्या माहितीप्रमाणे मृतदेह सापडल्याच्या दिवसापासून अंदाजे तीन दिवसांपूर्वी वाघिणीचा मृत्यू झाला असावा. माहितीमिळताच राष्ट्रीय बाघ सरंक्षण प्राधिकरणाचे (एनटीसीए) डॉ. प्रशांत देशमुख, मुख्यवनसरंरक्षक रमेश गनावा (खंडवा), तथा वनमंडळ अधिकारी विद्या भुषणसींग हे स्थानिक पदाधिकाऱ्यांसमोर शवदाह भस्मीकरण प्रक्रिया करण्यात आली. बुरहानपुर जिल्ह्याला लागलेल्या महाराष्ट्रातील जंगलातील वाघिण वाघिण स्थलांतरित असण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. वन्यजीवांपासून सरंक्षणासाठी शेताच्या धुऱ्यावर जिवंत इलेक्ट्रीक कुंपन लावण्यात येत असल्याने कदाचित करंट लागल्याने



वाघिणीचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, वाघिणीचा उत्तरीय तपासणीचा अहवाल वन विभागाला प्राप्त झाला आहे. बुहरानपुर रेंजमधील जम्बुपाणीच्या जंगलात सापडलेली वाघिण मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील असून तिच्या पोटातून ३ शावक काढण्यात आले होते, अशी माहिती बुरहानपुरचे वन मंडळ अधिकारी विद्या भुषण सिंह यांनी प्रसार माध्यमांना दिली. वाघिणीचा मृत्यू करंट लागून झाला असल्याचे देखील स्पष्ट झाले आहे.

# वडगाव माहोरे फाट्याजवळ गळती पुन्हा, आज-उद्या शहराचे पाणी बंद

## गळती दुरुस्ती युध्द स्तरावर करणार पण शहरातील राजकीय नेते लक्ष घालतील का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती–** गेल्यामहिन्यात २२ आणि २३ एप्रिल रोजी पाईप लाईन गळतीमुळे दोन दिवस शहराचा पाणी पुरवठा बंद होता. त्यानंतर लगेच १८ दिवसात पुन्हा वडगाव माहोरे फाट्यासमोर पाईपलाईन गळती दुरुस्ती करण्यासाठी सोमवार १२ मे आणि मंगळवार १३ मे रोजीशहरातील पाणी पुरवठा बंद राहणार अशी माहिती मजीप्राने दिली आहे.

अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या १५०० मीमी व्यासाच्या पी.एस.सी. नैपिंगळाई ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत असलेल्या गुरुत्ववाहीनीवर



वडगाव माहोरे फाटयासमोर रॉयल ओक शोरुम जवळ (रहाटगावंरिंगरोडलगत) पाईप लाईन गळती झाली आहे. त्यामुळे १२ मे ते १३ मे रोजी संपुर्ण अमरावती व बडनेरा शहराचा पाणी पुरवठा बंद राहील. गळती दुरुस्तीचे काम युध्व स्तरावर पुर्ण करण्यात येवून अमरावती व बडनेरा शहरातील पाणी पुरवट त्वरीत पुर्ववत करण्यात येईल. करीत नागरीकांनी पाण्याचा साठा करुन ठेवाव व पाण्याचा काटकसरीने वापर कराव असे मजीप्रा मार्फत आवाहन करण्य येत आहे.

# न्या. भूषण गवई १४ मे रोजी घेणार सरन्यायाधीश पदाची शपथ

## अंबानगरीत आनंदाची लाट, कुटुंबियांसह अनेक दिल्ली जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**–राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली पुढील मुख्य न्यायमूर्तीसाठी भूषण गवई यांच्या नावाला परवानगी दिली आहे. अमरावतीचे, महाराष्ट्राचे सुपुत्र न्या. भूषण गवई यांची भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भूषण गवई हे बुधवार १४ मे रोजी देशाचे पुढील न्यायमूर्ती म्हणून शपथ घेणार आहे. या शपथग्रहण सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी अमरावतीमधून न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांच्यासह कुटुंबातील सर्व सदस्य तसेच काही जवळची मंडळींसह अनेक जण दिल्लीला रवाना होणार आहे.



### माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटील, दिवंगत राज्यपाल दादासाहेब गवईनंतर अमरावतीला सर्वोच्च मान

**अमरावतीला तिसऱ्यांदा सर्वोच्च मान–** विशेष म्हणजे माजी महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून अमरावतीच्या शिरपेचा मानाचा तुरा रोवला होता. त्यानंतर बिहार, सिक्कीम आणि केरळचे राज्यपाल म्हणून दादासाहेब गवई यांना सुद्धा सर्वोच्च मान मिळाला होता. आता त्यांचेच पूत्र न्या. भूषण गवई हे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश म्हणून बुधवार १४ मे रोजी सकाळी ११ वाजता शपथ घेणार आहेत.कुटुंबियांसह अनेक जाणारराष्ट्रपती द्रौपदी मुर्मू न्या. भूषण गवई यांना सरन्यायाधीशपदाची शपथ देणार आहेत. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी न्या.गवई यांच्या मातोश्री माजीलेडी गव्हर्नर कमलताई गवई, त्यांचे बंधू डॉ. राजेंद्र गवई, मुलगी कृतिका गवई, दादासाहेब गवई यांचे बंधू वसंत गवई, डॉ. विश्वास गवई, न्या. गवई यांच्या भगीनी किर्ती अर्जुन, त्यांचा मुलगा धरम अर्जुन आदी कुटुंबिय, तसेच दादासाहेब गवई यांचे मानसपूत्र रुपचंद खंडेलवाल, अॅड. विजय तायडे, डॉ. भीमराज तायडे आदींसह त्यांचे जवळचे नातेवाईक, चाहते असे अनेक जण दिल्लीला जाणार आहेत.

### वकील संघाकडून सोहळा लाईव्ह

भूमीपूत्र न्या. भूषण गवई सरन्यायधीश पदाची शपथ घेणे हा अमरावतीच्या शिरपेचातील आणखी एक माना तुरा आणि आनंदाचा क्षण राहणार आहे. हा ऐतिहासिक सोहळा अनेकांना बघता यावा, यासाठी जिल्हा वकील संघाच्या वतीने १४ मे रोजी कोर्ट परीसरात मोठा स्क्रिन लावून या सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण करणार आहे.

# जिल्ह्यात १२१ ग्रापं. मध्ये पोट निवडणुकीची प्रतीक्षा अंतिम

## मतदार यादीचाही कार्यक्रम आटोपला

### ६ थेट सरपंचांसह १८९ सदस्यांच्या जागा रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती –** जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ दरम्यान मुदत संपणाऱ्या व रिक्त असलेल्या जागांवर पोट निवडणुकांकरिता निवडणूक आयोगाकडून मतदार यादी कार्यक्रम आटापला आहे. जिल्ह्यात १२१ ग्रामपंचायतींमध्ये सहा थेट सरपंच पदांसह १८९ सदस्यांच्या जागा रिक्त असल्याने




विभागाला ३१ डिसेंबरपर्यंतरिक्त जागांचा अहवाल आयोगाने मागितला होता. सदरचा अहवाल सादर करुन तीन महिने लोटत असताना आयोगाकडून २८ फेब्रुवारी पर्यंत रिक्त झालेल्या पदांचा अहवाल १३ मार्च पर्यंत निवडणुक आयोगाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तत्पुर्वी ११ मार्च रोजी आयोगाकडून निवडणुककरिता मतदार यादी कार्यक्रम लावण्यात आला होता. यामध्ये सार्वत्रिक आणि पोट निवडणुकांचा समावेश आहे. सद्यास्थितीत १२१ ग्रामपंचायतीं –मध्ये १८९ सदस्य व ६ सरपंच पदाच्या जागा रिक्त आहेत. निवडणुकांकरिता २६ मार्च रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी सुध्दाप्रसिद्धकरण्यात आली आहे. परंतु अद्यापही निवडणुक कार्यक्रम लावण्यात आला नाही. परंतु आता मे महिन्यांत कार्यक्रम लागण्याची शक्यता निवडणुक विभागाकडून वर्तविली जात आहे. त्यामुळे गावपुढाऱ्यांना या निवडणुकीची प्रतिक्षा लागली आहे.–

या ग्रामपंचायतींमध्ये २६ मार्च रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्दकरण्यात आली. परंतु निवडणुक कार्यक्रम मात्र अद्यापही लागला नाही. त्यामुळे गावपुढाऱ्यांना आता पोट – निवडणुकीची प्रतिक्षा लागली आहे.

जिल्ह्यात ग्रामपंचायतींमध्ये निधन, राजीनामा, अपात्र अशा कारणांमूळे रिक्त झालेल्या प्रदांकरिता पोटनिवडणूक घेणेअंतिम मतदार यादीचाही कार्यक्रम आटोपला ६ थेट सरपंचांसह १८९ सदस्यांच्या जागा रिक्त गरजेचे आहे. मागील एक वर्षांपासून सदर ग्रामपंचतींमध्ये पोटनिवडणूका रखडलेल्या आहेत. सुरूवातीला लोकसभा त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीमूळे या निवडणुकांना स्थगिती होती. यापुर्वी जिल्हा निवडणूक

# शंभरावर घरफोडी करणारा विदर्भामध्ये कुख्यात असलेला ‘स्पायडर’मॅन गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

विदर्भामध्ये स्पायडरमॅन म्हणून कुख्यात असलेल्या व १०० पेक्षा अधिक चोरी घरफोडीचे गुन्हे दाखल असलेल्या सराईत घरफोड्याला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले. १० मे रोजी त्याला नागपूर जिल्ह्यातील कोंढाळीलगतच्या सालई या गावातून अटक करण्यात आली. राम ऊर्फ स्पायडर दिनेश मडावी (३५, रा. सालई, कोंढाळी, ता. काटोल, नागपूर) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याने बेनोडा ठाण्यात नोंदविलेले दोन आणि वरुड व शेंदूरजनाघाट ठाण्यात नोंदविलेला प्रत्येकी एक अशा चार गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्याला बेनोडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

आरोपी स्पायडरने चोरी केलेले सोन्याचे दागिने सोनाराला विकले होते. त्या संबंधित सोनाराकडून ३.८५ लाख रुपये किमतीची ४३ ग्रॅम सोन्याची लगड, ४७५ ग्रॅम चांदीची लगड व गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोपेड असा एकूण ५ लाख १२ हजार ३४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. साथीदार सागर श्रावण कलमरे (रा. सालई) याच्यासोबत वरूड तालुक्यातील अलोडा, लोणी, लिंगा व पिपलागड येथे घरफोडी केल्याच्या कबुलीसह चोरीचे सोने आपण नागपूर जिल्ह्यातील दाभा येथील सोनाराला विकल्याचे त्याने एलसीबीला सांगितले. विशेष म्हणजे, शहर पोलिसांच्या क्राइम युनिटने त्याला गतवर्षी फेब्रुवारी महिन्यात अटक केली होती. तेव्हा त्याने शहरातील पाच गुन्ह्यांची कबुली दिली होती. त्यापूर्वी गाडगेनगर पोलिसांनीही त्याला अटक केली होती. आता एलसीबी पथकाने



स्पायडरला अटक करून वरूड तालुक्यातील चार गुन्हे उघड केले आहेत.

बेनोडा ठाण्याच्या हद्दीतील आलोडा येथील विमलाबाई कोडस्कर (६०) यांचे घर फोडून अज्ञाताने ३४ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख ३५ हजार असा एकूण २.३७ लाखांचा ऐवज लांबविला होता. ३० एप्रिल रोजी ती घटना उघड झाली होती. त्या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना ती घरफोडी राम मडावी ऊर्फ स्पायडरने केल्याची माहिती १० मे रोजी एलसीबीला मिळाली. त्या आधारे त्याला त्याच्या जावयाच्या घरून अटक करण्यात आली.

# स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान ही अटच केली रद्द

## एक घटक दोनदा नुकसानभरपाई; नवीन पीकविमा योजनेतून नुकसानीसह चार घटक वगळले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती –** गेली दोन वर्षे खरीप पीकविमा योजना एक रुपयात उपलब्ध करून दिल्यानंतर स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीसाठी भरपाई दिली जात होती. मात्र, याच घटकातून महसूल विभाग देखील पिकांच्या नुकसानभरपाईसाठी पीकनिहाय मदत करीत होते.त्यामुळे नवीन पीकविमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान ही अटच रद्द करण्यात आली आहे. या घटकाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर तक्रारीही होत्या. तांत्रिकदृष्ट्या या तक्रारी सोडविणे अशक्य झाल्यानेदेखील ही अट काढून टाकण्यात आल्याचे कृषी विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने खरीप २०२३ पासून पंतप्रधान खरीप पीकविमा योजना केवळ एक रुपयात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद तब्बल दहा पटींनी वाढला. स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान या घटकाअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई चांगल्या पद्धतीने मिळत असल्याने हा प्रतिसाद वाढला होता. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांना नुकसानीची सूचना द्यावी लागत होती. २०२३ च्या खरीप हंगामात या घटकाअंतर्गत ४६ लाख, तर २०२४ च्या खरीप हंगामात तब्बल ९२ लाख सूचना आल्या होत्या. प्रत्येक सूचनेची प्रत्यक्ष शेतावर जाऊन पडताळणी करणे, त्यानुसार नुकसानभरपाई ठरविणे, हे जिकिरीचे काम होते. त्यामुळेच नुकसान झाल्यानंतरही भरपाई मिळत नाही, अशी शेतकऱ्यांची तक्रार होती. दुसरीकडे राज्य सरकारकडून विमा कंपन्यांना मात्र हप्ता न चुकता मिळत होता. याचा रोषदेखील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येत होता.

दुसरीकडे स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे



नुकसान या घटकाअंतर्गत मदत व पुनर्वसन विभागाकडून कोरडवाहू, बागायती व फळपिकांच्या नुकसानीसाठी मदत केली जात आहे. त्यामुळे एकाच घटकाअंतर्गत राज्य सरकारकडून दोनदा नुकसानभरपाई दिली जात होती. त्यामुळेच खरीप पीकविमा योजनेतून हा घटक वगळण्यात आल्याचेही कृषी विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे.

एक रुपयात विमा उपलब्ध करून दिल्याने बनावट शेतकऱ्यांच्या नावाने अनेक गैरव्यवहार उघडकीस आले होते. याचा फटका राज्य सरकारला बसला होता.

या नवीन पीकविमा योजनेत जुन्या योजनेतील पाऊस न पडल्याने पेरणी न करता येणे, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान, नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे होणारे काढणीपश्चात नुकसान, तसेच पिकांच्या हंगामामध्ये हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणारे नुकसान हे चार महत्त्वाचे घटक वगळण्यात आले आहेत. यामुळे राज्य सरकारला नुकसानभरपाईपोटी विमा कंपन्यांना देण्यात येणाऱ्या निधीतदेखील घट होणार आहे. परिणामी राज्य सरकारचा मोठा पैसा वाचणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने आता पंतप्रधान पीकविमा योजनेमध्ये बदल करून यंदाच्या खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बीसाठी १.५ टक्का व नगदी पिकांना ५ टक्के असा शेतकरी हिस्सा घेऊन व उर्वरित पीक हप्ता केंद्र व राज्य सरकारमार्फत देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तर पीक कापणी प्रयोगांवर आधारित नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

# ५९ वर्षानंतर राज्यातील २२ सीमा चौक्या एकाचवेळी होणार बंद

## चौक्या बंदच्या बदल्यात संबंधित संस्थेला ५०४ कोटी रुपये चुकता करावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

परिवहन नियमांचे पालन, रस्ते कराची वसुली, वाहनांच्या हालचालीवर नियंत्रण आदी कारणांसाठी ५९ वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आलेल्या मोटार परिवहन सीमा चौक्या बंद करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. चौक्या बंदच्या बदल्यात संबंधित संस्थेला ५०४ कोटी रुपये चुकता करावे लागणार आहे. राज्यभरात ठिकठिकाणी असलेल्या २२ चौक्या एकाचवेळी बंद होणार आहे.




सन १९६६ मध्ये या चौक्या स्थापन झाल्या आहेत. जीएसटी लागू झाल्यानंतर आणि डिजिटल अंमलबजावणीच्या उपाययोजनांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे आवश्यकता उरलेली नसल्याने त्या बंदचे निर्देश केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्रातील परिवहन विभागाला दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही तसे निर्देश होते. प्रशासकीय त्रुटी दूर करून मुख्यमंत्र्यांना अहवाल पाठविला आहे. त्यांच्या मंजुरीनंतर चेकपोस्ट बंद होणार आहे.

**गैरप्रवृत्ती रोखण्यास मदत**

परिवहन आयुक्तांच्या अध्यक्षतेत गठित समितीने चेक पोस्ट बंदच्या निर्णयाचे परिणाम आणि परिणामकारकता याचा अभ्यास केला. ऑनलाइन प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक देखरेखीद्वारे प्रत्यक्ष चौकशीची गरज प्रभावीपणे बदलता येऊ शकते. कार्यक्षमतेत वाढ, विलंब कमी होणे, गैरप्रवृत्ती रोखण्यास मदत होईल, असे हे निष्कर्ष यातून काढत चौक्या बंदचा निर्णय घेण्यात आला.

**संस्थेला नुकसानभरपाई**

महाराष्ट्रात मोटार परिवहन आणि सीमाशुल्क विभागाच्या एकत्रित तपासणी नाक्यांसाठी 'इंटिग्रेटेड चेक पोस्ट' प्रकल्प राबवण्यात आला. त्यासाठी मे. अदानी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक करून त्यांच्यासोबत करार केला गेला. नाके बंदच्या निर्णयामुळे या संस्थेला नुकसान भरपाई म्हणून ५०४ कोटी रुपये दिले जाणार आहे. यानंतर संबंधित तंत्रज्ञान, स्थावर मालमत्ता परिवहन विभागाच्या मालकीची होणार आहे.

# नक्षल्यांकडून सहा महिन्यांसाठी युद्धविराम; बाह्य सुरक्षेला प्राधान्य

## करेगुट्टा अभियानात २६ नक्षल्यांचा खात्मा : सरकार आत्मसमर्पणावर ठाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१२गडचिरोली**

तीन राज्यांच्या सीमेवर करेगट्टा पहाडावर गेल्या १८ दिवसांपासून सुरू असलेले देशतील सर्वात मोठ माओवाद विरोधी अभियान आता सहा महिन्यांसाठी थांबवण्यात आले आहे. २६ माओवाद्यांना या अभियानात कंठस्नान घालण्यात सुरक्षा जवानांना यश आले. विशेष म्हणजे सरकार आत्मसमर्पणावर ठाम आहे.



तीन राज्यांच्या सीमेवर महाराष्ट्राच्या सीमेपासून ५० किलोमीटर अंतरावर करेगुट्टाचे मोठे पहाड आहे. १० हजार फूट किलोमीटर उंच असलेले करेगुट्टाच्या पहाडाला लागून अबूझमाड आणि इंद्रावती नॅशनल पार्क या दोन माओवाद्यांचेबलस्थानात अलीकडेच सुरक्षा दलांनी प्रवेश करून कॅम्प उभारल्याने काही वर्षापासून माओवाद्यांनी करेगुट्टा लगत असलेल्या परिसरात आपले वास्तव्याचे ठिकाण बनवले होते. या ठिकाणी माओवाद्यांनी एका महिन्यापूर्वी मोठ्या प्रमाणात आयइडीची स्फोटके पेरून ठेवली असल्यामुळे गावकऱ्यांनी या भागात येऊ नये असं पत्र काढलं होतं. मोठ्या प्रमाणात माओवादी या ठिकाणी वास्तव्याला असल्यानेच माओवाद्यांनी हे पत्र काढल्याचे सुरक्षा दलांच्या लक्षात आले त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार देशातला सगळयात मोठं माओवाद विरोधी अभियान या ठिकाणी राबवण्याचा निर्णय छत्तीसगडच्या सुरक्षा दलाने घेतला. यात छत्तीसगड पोलीस डीआरजी यांच्यासह सीआरपीएफ कोब्रा बटालियनचे कमांडो मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. या जवानांची संख्या २९ हजारांच्या जवळपास होती तर या अभियानात पहिल्यांदाच एमआय १७ या वायूदलाच्या हेलिकॉप्टरचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. तसेच या अभियानात अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या ड्रोन चा वापरही करून माओवाद्यांची रेकी करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले. जवानांनी या पहाडाला घेरण्याचे प्रयत्न सुरू केले. पहिल्याच दिवशी झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार झाले होते.. दरम्यान गेल्या १६ दिवसांत माओवाद्यांनी पेरून ठेवलेली अडीचशे पेक्षा जास्त आयडीची स्फोटके सुरक्षा दलाने त्याच ठिकाणी निष्क्रिय केली. या दरम्यान दोन जवानांसह तीन सुरक्षा दलाचे या ठिकाणी आयइडीच्या स्फोटात जखमी झाले. तर माओवाद्यांच्या वास्तव्यासाठी असलेली मोठी गुफा ही जवानांनी शोधून काढली होती.. दोन दिवसांपूर्वी अभियानाच्या १५ व्या दिवशी जवान आणि माओवादी यांच्यात मोठी चकमक झाली आणि तब्बल २२ माओवद्यांना कंठस्नान घालण्यात यश आला आहे.

या पहाडावर माओवाद्यांची सर्वात मोठी आक्रमक असलेल्या बटालियनचे नेते हिडमा, देवा तेलंगाणा समितीचा प्रभारी दामोदर यांच्यासह दंडकारण्य झोनल समितीचे नेते आणि हजारच्या जवळपास माओवादी उपस्थित असल्याची सुरक्षा दलांकडे विश्वासनीया माहिती होती. त्यातूनच हे अभियान मोठ्या प्रमाणात राबवण्यात आलं होतं. या अभियानावर केंद्रीय गृह मंत्रालयासह देशातल्या सगळ्या वरिष्ठ सुरक्षा एजन्सीची नजर होती.

जवानांनी त्या काळात नीलम शराय आणि धोबी पहाड हे दोन पहाड आपल्या ताब्यात घेतले होते. त्यानंतर करेगटाच्या दिशेने जवानांची आगे कूच सुरू होते. आज १८ वा दिवस असताना ९ रोजी संध्याकाळपासूनच जवानांना परत येण्याचे निर्देश देण्यात आले.

# अखंडित वीज पुरवठ्यासाठी रोहित्र आणि उपकेंद्राच्या कामाची दर आठवड्याला देखभाल दुरूस्ती करा - मुख्य अभियंता अशोक साळुंके

## वीज ग्राहकांशी संवाद ठेवा, त्यांना प्रतिसाद द्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

अखंडित वीज पुरवठा ही महावितरणची जबाबदारी आहे.अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी उपकेंद्र आणि वितरण रोहित्राच्या देखभाल दुरूस्तीचे काम दर आठवड्याला हाती घ्या,तसेच तांत्रिक दोष निर्माण होऊन निकामी झालेले वीज साहित्य आणि रोहित्रे वेळेत बदला,वीज वाहिन्यांची नियमित तपासणी करून दोष आढळल्यास दुरूस्त करा, यासोबतच यंत्रणा सक्षमिकरण आणि विस्तारीकरणासाठी आवश्यक वीज यंत्रणेसाठी वितरण रोहित्र आणि गाव निहाय डिपीआर तयार करा असे निर्देश मुख्य अभियंता अशोख साळुंके यांनी दिले आहे.विजेच्या मागणीत होत असलेली वाढ बघता अतीभारामुळे काही ठिकाणी महावितरणची यंत्रणा प्रभावित होऊन वीज पुरवठा खंडित होतो.त्यामुळे आगामी काळातील विजेची मागणी बघता आणि ओव्हरलोडिंगचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली



काढण्यासाठी आणि वीज ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा करता यावा यासाठी पुढील १० ते १५ वर्षाचा वेध घेऊन प्रत्येक शाखा अभियंता यांनी वितरण रोहित्रे तसेच गाव निहाय डिपीआर तयार करावा,यामध्ये प्रामुख्याने वीज यंत्रणेची वाढीव कामे,कामाचे सक्षमीकरण आणि उपरिवाहिन्या भूमिगत करणे इत्यादीं कामाचा समावेश करावा

**देखभाल दुरूस्तीच्या कामांना गती द्या**

मागिल काही दिवसांपासून सुरु असलेल्या उन्हाच्या तडाक्यासोबतच अधून-मधून येणारा अवकाळी पाऊस व त्यानंतरच लगेचच सुरु होणारा पावसाळा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने हाती घेतलेली मान्सुमपुर्व देखभाल व दुरुस्तीची कामांना गती द्या, देखभाल दुरूस्तीची कामे करतांना विशिष्ट वेळेत आणि ग्राहकांना आगाऊ माहिती देऊन काम करा.तसेच प्रत्येक विभागीय कार्यकारी अभियंता यांनी शाखा कार्यलयापर्यंत देखभाल दुरूस्तीचे कामे गतीने होत आहे याची खातरजमा करा.

## अमरावतीच्या वैद्यकीय इतिहासात क्रांतिकारक पाऊल....

# आ. सौ. सुलभाताई खोडके यांच्या दूरदृष्टीतून अवयव प्रत्यारोपणासाठी झोनल यंत्रणा साकारतेय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

केवळ स्वप्न पाहणे नव्हे, तर त्याची अमलात रूपांतर करण्याची क्षमता ज्यांच्याकडे आहे, असे नाव म्हणजे आमदार - सौ.सुलभाताई खोडके. अमरावतीच्या वैद्यकीय सेवांमध्ये एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी टप्पा गाठत, आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या पुढाकाराने विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती )येथे आता 'ऑर्गन ट्रान्सप्लांट झोनल यंत्रणा' साकार होत आहे.



किडनी, लिव्हर आणि हृदय प्रत्यारोपण यांसारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेल्या अद्ययावत सुविधा, ऑपरेशन थिएटर, प्रशिक्षित डॉक्टर्सची टीम आणि एक सुसज्ज यंत्रणा उभी करण्याचा संकल्प आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केला आणि त्या संकल्पाचे रूपांतर आता वास्तवात होत आहे.

या दृष्टीने त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन उच्च दर्जाचे ऑपरेशन थिएटर मंजूर करून घेतले आहेत - एक अवयव रिट्रायव्हलसाठी व दुसरे प्रत्यारोपणासाठी. ही रचना केवळ तांत्रिक यंत्रणांपुरती मर्यादित नसून, तज्ञ डॉक्टरांचे प्रशिक्षण, कार्यसंघांची उभारणी आणि जनजागृतीसाठीच्या उपक्रमांचा समावेश यामध्ये आहे.

सध्या निधी मंजूर होऊन कामाला सुरुवात झाली आहे. लवकरच झोनल ट्रान्सप्लांट कार्यालयही अमरावतीत स्थापन होणार असून, हा प्रकल्प विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्श ठरणार आहे.आरोग्याच्या क्षेत्रात बदल घडवायचा असेल, तर केवळ धोरणे नव्हे, तर कृतीशील इच्छाशक्ती लागते - आणि ती आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्याकडे आहे, अशी प्रतिक्रिया वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

या उपक्रमामुळे हजारो रुग्णांना नवजीवन मिळणार असून, अमरावती आता आधुनिक आरोग्यसेवेचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. हे यश आमदार -सौ. सुलभाताई खोडके यांच्या सशक्त नेतृत्वाचे प्रतीक असून, जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी त्यांनी उचललेले हे पाऊल 'मोडेल' ठरणार आहे.

# चंद्रभानजी विद्यालयाच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचा समारोप

## ग्रामिण भागात अतिशय उपयुक्त उपक्रम-मान्यवरांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

येथून जवळच असलेल्या कुंड सर्जापूर येथे चंद्रभानजी विद्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती, नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचा समारोप करण्यात आला. या समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती जिल्हा वकिल संघाचे उपाध्यक्ष ड. आशिष लांडे व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. मंगेश व्यवहारे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रभानजी विद्यालयाचे मुख्याध्यापक नामदेव चव्हाण होते. मंचावर ज्येष्ठ शिक्षक श्रीकांत लाजूकर उपस्थित होते.श्री हनुमंताच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाला



सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलतांना डॉ. मंगेश व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांनी आता खेळाकडे करीअर म्हणून बघण्याची आवश्यकता आहे असे सांगून या विद्यालयाचे ४० हून अधिक विद्याथ शासकीय सेवेत रुजू झाले आहे ग्रामिण भागात ही फार मोठी उपलब्धी असल्याचे सांगून या पुढेही विद्यार्थ्यांनी त्यांची प्रेरणा घेत आपले आयुष्य घडवावे असा सल्ला त्यांनी दिली. तसेच या शिबीरातून उत्कृष्ठ विद्यार्थ्याला आपल्याकडून स्पोर्टस किट देण्याचे जाहिर केले.अमरावती जिल्हा वकिल संघाचे उपाध्यक्ष ड. आशिष लांडे यांनी ग्रामिण भाग असतांना सुध्दा कुंड सर्जापूर या गावात क्रीडा शिक्षकांनी एक क्रीडामय वातावरणाची निर्मीती केली आहे ही काही सोपी बाब नाही. आज या विद्यालयाचे १२०० हून अधिक विद्याथ राज्यस्तरावर, ६५ हून अधिक विद्याथ राष्ट्रीय स्तरावर खेळले आहे ही फार मोठी उपलब्धी आहे. विद्यार्थ्यांनी आपण ग्रामिण भागातील असल्याचा न्यूनगंड बाळागता कामा नये, खेळामध्ये आज अनेक संधी उपलब्ध आहे, त्याचा आपण फायदा घ्यावा तसेच सर्वांना याची माहिती द्यावी असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षस्थानावरून बोलतांना मुख्याध्यापक श्री चव्हाण यांनी विद्यालय नेहमी खेळाला प्रोत्साहन देत आहे, आजवर अनेक विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे, येथे प्रवेशित होणाऱ्या नविन विद्यार्थ्यांनी सुध्दा त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.गेल्या १७ वर्षांपासून शाळेच्या वतीने हे क्रीडा प्रशिक्षण शिबीर आयोजित होत असून यातूनच विद्याथ स्पर्धेकरीता तयार होत असतो. गेल्या वर्षी सॉफ्टबॉल व बेसबॉल या खेळामध्ये शाळेतील ८० विद्याथ राज्यस्तरावर तर चार विद्याथ राष्ट्रीय स्तरावर खेळले त्यापैकी दोघांना राष्ट्रीयस्तरावर सुवर्णपदक तर दोघांना कास्यपदक प्राप्त झाले आहे. तर बेसबॉल मध्ये राज्यस्तरावर १४ वर्ष मुले व मुलींच्या संघाने तृतीय स्थान तर सॉफ्टबॉल मध्ये मुलांच्या संघाने व्दितीयस्थान पटकाविले असल्याची माहिती या शिबीराचे संयोजक व क्रीडा शिक्षक शरद गढीकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाचे संचालन व आभार आर.एस. मानकर यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद ए.पी. मांगे, ए.व्ही. राजगुरे,के.एस. लाजूरकर, व्ही.के.राठोड यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी सी.ए.शेंडे व आर.एस.मडावी आदी उपस्थित होते.

# ७५ हातपंप बंद, १७ टँकरने पाणीपुरवठा : चिखलदरा तालुक्यातील ८ गावात भयावह स्थिती : जलजीवन मिशनचा उडाला बोजवारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ चिखलदरा**

मे महिन्याच्या मध्यावर जिल्ह्यातील पाणीटंचाईचा प्रश्न तीव्र झाला असून सद्यःस्थितीत जिल्ह्यात नऊ गावांना १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करून ग्रामस्थांची तहान भागविली जात आहे. चिखलदरा तालुक्यातील आठ तसेच चांदूरेल्वे तालुक्यातील एका गावाचा यामध्ये समावेश आहे. विशेष म्हणजे शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्चुन राबविण्यात आलेल्या जलजीवन योजनेचा जिल्ह्यात पुरता बोजवारा उडाला आहे. जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात सर्वाधिक



टंचाईची तीव्रता दिसून येत आहे. चिखलदरा तालुक्यातील आठ गावांना टँकरने पाणी पुरविण्यात येत आहे. तर याच तालुक्यात १७खासगी विहिरींचे अधिग्रहनसुद्धा करण्यात आले आहे. त्यापैकी गावांची तहान भागविण्यासाठी आठ तर टँकरकरिता नऊ खासगी विहिराचे अधिग्रहण करण्यात आले आहे. येत्या काही दिवसांत पाण्याची टंचाई पुन्हा एकदा डोके वर काढणारअसून टँकरवर अवलंबित्वाच्या गावांच्या संख्येत वाढ होण्याची भीती व्यक्त होत आहे. यंदाचा पाणीटंचाई निर्मूलन कृती आराखडा हा १७ कोटी ७३ लाखांचा असून त्यामध्ये विविध उपाययोजनांवर भर राहणार आहे.

**या गावांना होतोय टँकरचा पाणीपुरवठा**

चिखलदरा आकी, खडीमळ, मोथा, लवादा, तारुबंध, गौलखेडा बाजार, मेहरियम, बहादरपूर, गवळीठाणा, चांदूर रेल्वे सावंगी मगरापूर.

यंदा तर मार्च महिन्यातच पाणीटंचाईची तीव्रता वाढली होती. आता एप्रिलमध्ये टँकरची संख्या वाढली आहे. विशेष म्हणजे केवळ ग्रामीण भागच नव्हेतर बडनेरा व अमरावती शहरातील काही भागांमध्ये सुद्धा यंदा पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. त्यामुळे जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जिल्ह्यात जवळपास ७५ हातपंप बंद अवस्थेत असल्याने सुरू असलेल्या हातपंपांवर पाणी मिळविण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. हातपंपांच्या दुरुस्तीसाठी असलेल्या पथकामध्ये तंत्रज्ञ कमी असल्याने दुरुस्तीवर परिणाम होत आहे.

# शहरात जोरदार वाऱ्यासह हलक्या पावसाची हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मे महिन्याच्या सुरुवातीपासून उन्हाची दाहकता अनपेक्षितपणे कमी झालेली आहे. दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पारा शक्यतोवर ४४ ते ४५ अंशांच्या आसपास असतो. यंदा मात्र मे महिन्याच्या सुरुवातीपासून सातत्याने ढगाळ वातावरणासोबतच काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळत आहेत. वातावरणातील या बदलामुळेच तापमान घसरले आहे. दरम्यान रविवारी दुपारी ४ वाजता शहरात सोसाट्याचा वारा सुटला आणि काही भागात हलका पाऊस



कोसळला आहे.वातावरणात झालेल्या या बदलामुळे रविवार आणि सोमवारी शहरात तापमान घसरले होते. रविवारी ४०.८ अंश तापमानाची नोंद झाली आहे. पुढील दोन दिवसही अशाच प्रकारचे तापमान राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. वातावरणातील या बदलामुळे मे महिन्यातही नागरिकांना काही दिवस का होईना जीवघेण्या उष्म्यापासून दिलासा मिळत आहे. दुसरीकडे दररोज सायंकाळी सुटणारा सोसाट्याचा वारा आणि हलक्या पावसामुळे मात्र उन्हाळी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये धडकी भरत आहे. अशा वातावरणामुळे पाऊस किंवा गारपीट झाल्यास हाताशी आलेले पीक हातातून जाण्याची दाट शक्यता आहे.

